| MHRT140000132024 | **नियमित दिवाणी दावा क्र.०४/२०२४**<br>(CNR No.MHRT14-000013-2024)<br>(नागेश भिकु धाडसे वि. अविनाश भिकु धाडसे) |
|---|---|

**निशाणी ३४ खालील आदेश**
**(दिनांक २०.०३.२०२४)**

**०१.** वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ अन्वये प्रतिवादींचे विरुध्द म्हाप्रळ ग्रामपंचायत घर क्र.१०६ मधील वादी क्र.१ यांचे कब्जेवहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करु अथवा करवू नये तसेच घरामध्ये जाण्यास मज्जाव करु अथवा करवू नये असा अंतरिम मनाई आदेश होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्ज (नि.क्र.३४) व म्हणणे (नि.क्र.३९) वाचले. सर्व कागदपत्रे व प्रकरणांचा अभिलेख पाहिला. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. बी. बेर्डे व प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एम. ए. लोखंडे यांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** मौजे म्हाप्रळ, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी येथील म्हाप्रळ ग्रामपंचायत घर क्र.१०६ हा या दाव्याचा विषय आहे. यापुढे या मिळकतीस संक्षिप्तपणे 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.

**०४.** वादी असे कथन करतो की, वादी व प्रतिवादी क्र.१ ते ८ हे सख्खे भाऊ बहिण असून प्रतिवादी क्र.६ मयत झाले असून त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांना दाव्याचे कामी पक्षकार करण्यात आले आहे. दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांची एकत्रित

.... २ .......

सामाईक मालकी व कब्जे वहिवाटीची वडीलोपार्जित दावा मिळकत असून ते त्यांचे मुळ घर आहे. मुळ घरामध्ये वादी व प्रतिवादी राहत होते व आहेत. तसेच प्रतिवादी हे सणानिमित्त व कुलदेवताच्या पुजेनिमित्त त्या घरात येत जात असतात. दावा मिळकतीमधून अन्य प्रतिवादी व वादी यांनी हक्क सोडलेला नाही. दावा मिळकतीच्या कर आकारणी पत्रकावर वादी व प्रतिवादी यांचे वडील भिकू सुडक्या उर्फ सुडकोजी धाडसे यांचे नाव नमुद आहे. दावा मिळकत ही वडीलोपार्जित व सामाईक मिळकत असताना देखील ग्रामपंचायत, वादी व इतर प्रतिवादी यांची संमती न घेता प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकतीमध्ये दुरुस्ती करीत आहे व त्याद्वारे दावा मिळकतीवरती हक्क गाजवण्याचा प्रयत्न करीत आहे. परिणामी प्रतिवादी क्र.१ यांनी कोणतेही बांधकाम किंवा दुरुस्ती करुन दावा मिळकतीची स्वरुप बदलू नये व केवळ स्वतःचा हक्क गाजवू नये या करीता निरंतर मनाई व दावा मिळकतीच्या कर आकारणी उताऱ्यावरती वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाची नोंद करणेबाबत आज्ञार्थी ताकीदीकरीता दावा दाखल केला आहे.

०५. वादी पुढे असे कथन करतो की, दावा दाखल केल्यानंतर न्यायालयाने परिस्थिती जैसे थे ठेवण्याचा आदेश केले असताना देखील वादी क्र.१ हा दावा मिळकती म्हणजे ग्रामपंचायत घर क्र.१०६ च्या दरवाज्याच्या डाव्या बाजूकडील खोलीमध्ये राहत असून तेथे त्यांचे साहित्य आहे. असे असताना प्रतिवादी क्र.१ व त्यांचे कुटूंबिय वादी क्र.१ यांना त्यांना घरामध्ये जाण्यास मज्जाव करीत आहेत. वादी क्र.१ हे नोकरी निमित्त मुंबई येथे राहत आहेत व सणासुदीला गावाला येवून दावा मिळकतीमध्ये सामाईक घरातील त्यांच्या हिश्याच्या घरामध्ये राहतात. दरम्यानच्या काळामध्ये शिमगा या सणास त्यांना

.... ३ .......

यावयाचे असून वादी क्र.१ यांच्या कब्जे वहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करु नये, घरामध्ये म्हणजेच दावा मिळकतीमध्ये येण्यापासून मज्जाव करु नये या करीता असा आदेश होणेची विनंती केली आहे.

**०६.** वादीने कथनांच्या पुष्ठ्यर्थ यादी (नि.क्र.७) सोबत ग्रामपंचायत घर क्र.१०६ ची कर आकारणी उताऱ्याची सहिसूद प्रत, फेरफार क्र.६९६७ ची सहिसूद प्रत, दि.०५/०१/२०२४ रोजीचे ग्रामपंचायतीला दिलेल पत्र, दावा मिळकतीचे वस्तुस्थिती दर्शक छायाचित्रे तसेच निशाणी क्र.४३ सोबत अनुक्र.१ ला दावा मिळकतीमध्ये एकत्रित सण साजरे करीत असलेबाबत एकुण पाच छायाचित्रे हजर केली आहेत.

**०७.** अंतरिम मनाई अर्जावर प्रतिवादी क्र.१ यांनी म्हणणे (नि.क्र.३९) दाखल केले आहे. तसेच प्रतिवादी क्र.२, ४ ते ८ यांनी प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.३९ वरती दिलेले म्हणणे हेच त्यांचे म्हणणे असल्याची पुरशिस नि.क्र.४६ वरती दाखल केली आहे. प्रतिवादी क्र.३ व ९ यांना पुरेशी संधी देवून त्यांनी म्हणणे दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रस्तुतचा अर्ज विनाम्हणणे चालविण्यात येत आहे.

**०८.** प्रतिवादींनी वादी प्रस्तुत अर्जातील संपुर्ण मजकुर नाकारलेला आहे. प्रतिवादींचे कथनानुसार, वादी व प्रतिवादी यांचे वडील हयात असतानाच कौटूंबिक वाटपानुसार दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांचे हिश्यामध्ये देण्यात आली असून प्रतिवादी क्र.१ हा त्यांचे वडीलांपासून आज तारखेपर्यंत दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट करीत आहे. वादी क्र.१ हा कायमस्वरुपी मुंबई येथे वडीलोपार्जित खोलीमध्ये राहत आहे. प्रतिवादी क्र.१ हा ग्रामपंचायत घर क्र.१०६ म्हणजेच दावा मिळकतीमध्ये, प्रतिवादी क्र.२

हा ग्रामपंचायत घर क्र.४६५ मध्ये, प्रतिवादी क्र.३ ग्रामपंचायत घर क्र.६४४ मध्ये राहत आहेत. प्रतिवादी क्र.४ ते ७ या बहिणी असून ते त्यांच्या त्यांच्या सासरच्या घरामध्ये राहत आहेत.

**०९.** प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी हे पुर्वीपासून स्वतंत्र राहत असून प्रतिवादी क्र.१ राहत असलेले घर हे पक्या स्वरुपाचे असल्याने ते हडप करण्याच्या उद्देशाने प्रतिवादी क्र.१ याचेविरुध्द कोणतेही कारण घडले नसताना खोटा दावा व अर्ज दाखल केला आहे. वादी क्र.१ हा कायमस्वरुपी मुंबईत राहत असून दावा मिळकतीमध्ये त्याची कब्जेवहिवाट नाही व एकत्रित कोणतेही धार्मिक सण साजरे करीत नाहीत. त्यामुळे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**१०.** प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठ्यर्थ यादी (नि.क्र.४५) सोबत अनुक्र.१ ला इतर प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र.१ यास दिलेले मुखत्यारपत्र, नि.क्र.१९ सोबत दावा मिळकतीचे वस्तुस्थितीदर्शक पाच छायाचित्रे, नि.क्र.४१ सोबत कर आकारणी पत्रके, वीजबीले, पाणी पट्टी व घरपट्टीच्या पावत्या हजर केल्या आहेत.

**११.** अर्ज, म्हणणे व दोन्ही बाजुंचे युक्तीवाद यावरुन या अर्जावर निर्णय देण्यासाठी खालील मुद्दे निघतात. त्यांचेसमोर मी माझे निष्कर्ष नमुद केले असून त्या खाली त्याची कारणे नमुद केले आहेत.–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस असल्याचे शाबित केले आहे काय ? | **होय** |

| | | |
|---|---|---|
| २. | तुर्तातूर्त ताकीदीचा अर्ज नामंजुर झालेस वादीचे अपरिमित व कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे वादीने शाबीत केले आहे काय ? | **होय** |
| ३. | न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे असे वादीने शाबीत केले आहे काय ? | **होय** |
| ४. | काय आदेश? | **...अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र. १ ते ३ करिता–**

मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी निगडीत व पुरक असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दा क्र.१ ते ३ एकत्रित विचारार्थ घेण्यात येतात.

**१२.** वादी यांचे कथनानुसार, दावा मिळकत ही वडीलोपार्जित सामाईक वादी व प्रतिवादी क्र.१ ते ८ यांची मिळकत आहे. त्या मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची कब्जेवहिवाट असून सणानिमित्त व कुलदेवतेच्या धार्मिक विधीनिमित्त दावा मिळकतीमध्ये वादी यांचे येणे–जाणे असते. तसेच वादी क्र.१ यांचे साहित्य दावा मिळकतीमधील दरवाज्यास लागून डाव्या बाजुच्या खोलीमध्ये आहे. वादी यास प्रतिवादी क्र.१ ने घरामध्ये येण्यापासून मज्जाव करीत आहे. याउलट, प्रतिवादी यांचे कथनानुसार दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांच्या हिश्यामध्ये कौटूंबिक वाटपानुसार आलेली आहे. दावा मिळकतीमध्ये केवळ प्रतिवादी क्र.१ यांची कब्जेवहिवाट असून वादी क्र.१ हे कायमस्वरुपीपणे वडीलोपार्जित खोलीमध्ये मुंबई येथे राहत आहेत.

**१३.** उभयपक्षकारांचे दावा मिळकतीबाबत नमुद केलेल्या कथनांचा विचार करता दावा मिळकत ही वडीलोपार्जित व सामाईक मिळकत असलेबाबत वाद नाही, परंतु प्रतिवादी क्र.१ चे कथनांनुसार दावा मिळकत ही कौटूंबिक वाटपानुसार त्याचे कब्जेवहिवाटीस देण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये अभिलेखावरती उभयपक्षकारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता दावा मिळकत व इतर मिळकतीवरती वादी व प्रतिवादी यांचे वडील भिकू सुडक्या उर्फ सुडकोजी धाडसे यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते.

**१४.** दावा मिळकत ही वडीलोपार्जित व सामाईक कधीही नव्हती असे स्पष्ट प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये नमुद केलेले नाही. महत्वपुर्ण बाब अशी की, कौटूंबिक वाटपासंदर्भातील कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादी यांनी अभिलेखावरती दाखल केलेला नाही. तसेच तोंडी वाटप झालेबाबतचे तपशिलवार वर्णन नमुद केले असल्याचे देखील दिसून येत नाही. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे कथनांचे पुष्ठर्थ्य दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले सदरचे कागद हे वीजबीले, घर पट्टी व पाणी पट्टीच्या पावत्या आहेत. परंतु, त्या करपावतीवरती देखील भिकू सुडक्या धाडसे असे नाव नमुद आहे. सदर पावत्या व वीजबीले हे प्रतिवादी क्र.१ यांचे कब्जात आहेत असे मानले तरी कौटूंबिक वाटपानुसार दावा मिळकत ही केवळ प्रतिवादी क्र.१ यांचे कब्जेवहिवाटीस दिली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. एकंदरीत उपरोक्त विवेचनावरुन दावा मिळकत ही कौटूंबिक वाटपानुसार प्रतिवादी क्र.१ याचे कब्जेवहिवाटीस दिल्याचे दिसून येत नाही.

**१५.** वादी यांनी दाखल केलेल्या छायाचित्रांचे अवलोकन केले असता वादी व प्रतिवादी हे एकत्रित सण साजरे करतात असे दिसून येते. वादी यांनी दाखल केलेले छायाचित्र हे खोटे व बनावट आहे असे प्रतिवादींचे कथन नाही. एकंदरीत दाखल कागदपत्रांवरुन दावा मिळकत ही वडीलोपार्जित व सामाईक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ८ यांचे दरम्यानचे नातेसंबंध प्रतिवादी यांनी नाकारलेले नाही. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ८ ही भावंडे आहेत. दावा मिळकत ही प्रथमदर्शनी वडीलोपार्जित व सामाईक असल्याचे दिसून येत असल्याने दावा मिळकतीमध्ये प्रत्येकाची कब्जेवहीवाट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

**१६.** प्रतिवादींचे कथनांनुसार, वादी क्र.१ हे मुंबई येथे कायमस्वरुपी वडीलोपार्जित खोलीमध्ये राहण्यास आहेत परंतु तसा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावरती दाखल नाही. दावा मिळकत ही प्रथमदर्शनी वडीलोपार्जित व सामाईक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी क्र.१ हे मुंबई येथे राहत असलेमुळे दावा मिळकतीमध्ये त्यांची कब्जेवहिवाट नाही असे म्हणता येणार नाही. दावा मिळकतीमध्ये म्हणजेच घर क्र.१०६ मध्ये वादी यांना येणेपासून मज्जाव करण्याचा अधिकार प्रतिवादी क्र.१ यांना नाही.

**१७.** प्रस्तुत अर्जामध्ये वादी यांनी सर्व प्रतिवादी यांचेविरुध्द तुर्तातूर्त मनाई आदेश होणेची विनंती केली आहे. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.२ ते ८ हे वादी क्र.१ यांची कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा भविष्यात करतील त्या करीता तुर्तातूर्त मनाई आदेश त्यांचेविरुध्द होणेस गरजेचे आहे. प्रतिवादीतर्फे

.... ८ .......

विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२ ते ८ यांची विरुध्द वादी यांची दाव्याची कामी कोणतीही मागणी नाही असे नमुद केले आहे. त्यामुळे अंतरीम अर्जामध्ये प्रतिवादी क्र.२ ते ८ यांचेविरुध्द वादीची कोणतीही मागणी मंजुर करता येणार नाही.

**१८.** वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, परिच्छेद क्र.९ मध्ये दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.२ ते ८ हे मयत भिकू धाडसे यांचे कायदेशीर वारस असल्याने त्यांना पक्षकार केले आहे व त्यांचेविरुध्द दाव्याचे कामी कोणतीही मागणी नाही असे नमुद केल्याचे दिसून येते. वादपत्रामध्ये प्रतिवादी क्र.२ ते ८ यांचेविरुध्द वादी यांनी कोणतीही मागणी केलेली नाही. प्रस्तूत अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ हा वादी यांचे दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.२ ते ८ यांनी वादी यांची दावा मिळकतीमधील वादी यांची कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केली असे कथन केलेले नाही. यावरुन प्रतिवादी क्र.२ ते ८ यांचेविरुध्द प्रस्तुत अर्जातील मागणी मागण्याचे कोणतेही कारण घडले नसल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.२ ते ८ विरुध्द प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होणारे नाही.

**१९.** उपरोक्त विवेचनाचा विचार करता, वादी हा त्याचे बाजुने प्रथमदर्शनी केस असल्याचे शाबीत करीत आहे. प्रथमदर्शनी केस ही वादीच्या बाजुने असल्यामुळे न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजुने आहे. प्रस्तुतचा अंतरिम मनाई अर्ज मंजुर न केल्यास वादी यांचे अपरिमित व कधीही भरून न येणारे नुकसान होणारे आहे असे दिसून येते.

२०. उपरोक्त वरील सर्व कारणास्तव वादी हे प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द तुर्तातूर्त ताकीदीचा अनुतोष मिळणेस पात्र आहे. सबब मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज खर्चासह अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी स्वतः अगर त्यांचेमार्फत इतर इसमांमार्फत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीमधील वादी क्र.१ चे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु अथवा करवू नये तसेच त्यांना दावा मिळकतीमध्ये येणेपासून मज्जाव करु नये अथवा करवू नये अशी तुर्तातूर्त ताकीद देण्यात येते.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करणेत आला आहे.)

**(एम. ए. शिंदे)**

**दिनांक –२०/०३/२०२४.** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मंडणगड**

| I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order. | | |
|---|---|---|
| Court Name | :- | Civil Judge, J.D. & J.M.F.C., Mandangad, Taluka Mandangad, District- Ratnagiri. |
| Name of Stenographer | :- | Shri. D. R. Joshi |
| Date of Decision | :- | 20/03/2024. |
| Signed by P.O. on | :- | 20/03/2024. |
| Uploaded on | :- | 21/03/2024. |

.... .......